RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक २०(८)] शुक्रवार, फेब्रुवारी १३, २०२६/माघ २४, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महसूल व वन विभाग

मंत्रालय (मुख्य इमारत), पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६.

**आदेश**

**महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१.**

क्रमांक आयसीएच-२०२३/प्र.क्र.४४/ल-७.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. सत्तावीस) (यात यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम"असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ४७, पोट-कलम (१), खंड (ब) च्या तरतुदीनुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र**, भाग-४ ब, मध्यवर्ती उपविभाग, असाधारण क्रमांक २३६, दिनांक २६ जून २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेला महसूल व वन विभाग, शासन आदेश क्रमांक आयसीएच-२०२३/प्र.क्र.४४/ल-७, दिनांक २६ जून २०२५ (यात यापुढे ज्याचा "उक्त आदेश"असा निर्देश करण्यात आला आहे) अन्वये वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी (बु.), ता. हवेली, जि. पुणे (यात यापुढे ज्याचा "सार्वजनिक विश्वस्त संस्था"असा निर्देश करण्यात आला आहे) या विश्वस्त संस्थेस मौजे गोपाळपूर (रिठी), मौजे म्हसाळा व मौजे खापरी (सुभेदार), तालुका नागपूर ग्रामीण, जिल्हा नागपूर येथील एकूण ६९.७३ हेक्टर जमीन धारण करण्यास विशिष्ट अटी व शर्तीच्या अधीन राहून उक्त अधिनियमातील तरतुदीमधून सूट देण्यात आली आहे;

आणि, ज्याअर्थी, सदर सार्वजनिक विश्वस्त संस्थेला नव्याने मंजुरी देण्याबाबत शासन विचाराधीन असल्यामुळे, यासंबंधी यापूर्वी निर्गमित केलेला शासन आदेश रद्द करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. सत्तावीस) च्या कलम ४७, पोट-कलम (१), खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, याद्वारे महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. आयसीएच-२०२३/प्र.क्र.४४/ल-७, दिनांक २६ जून २०२५ रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Mantralaya (Main Building) 1st Floor, Madam Cama Marg,
Hutatma Rajguru Square, Mumbai 400 032, dated 13th February 2026.

### Order

Maharashtra Agricultural (Lands Ceiling on Holdings) Act, 1961.

No. ICH-2023/C.R.44/L-7.— Whereas, by the Government Order, Revenue and Forest department, No. ICH-2023/C.R..44/L-7, dated 26th June 2025 (hereinafter referred to as "the said Order") published in the *Maharashtra Government Gazette*, Part-4 B, Central Sub-division, Extraordinary No.236, dated 26th June 2025, issued in pursuance of the provisions of clause (b) of sub-section (*1*) of Section 47 of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961 (Mah. XXVII of 1961) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra had exempted the 69.73 hectare land being so held by Vasantdada Sugar Institute Ltd., Manjari BK, Taluka Haveli, District Pune (hereinafter referred to as "the said Public Trust") at Mauje Gopalpur (Rithi), Mauje Mhasala, and Mauje Khapri Subhedar, Taluka Nagpur (Rural), District Nagpur from the provisions of the said Act subject to certain terms and conditions mentioned therein ;

And whereas, the Government thinks to grant a fresh approval to the said Public Trust, it is necessary to rescind the said earlier Government Order issued in this behalf.

Now, therefore in exercise of the powers conferred by clause (b) of sub-section (*1*) of Section 47 of the Maharashtra Agricultural Lands (Ceiling on Holdings) Act, 1961 (Mah. XXVII of 1961), the Government of Maharashtra hereby rescinds the Government Order, Revenue and forest Department, No. ICH-2023/C.R.44/L-7, dated 26th June 2025.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.